

## जनसंपर्क विभाग

जळगाव २०, (प्रतिनिधी) : महिलांना समान संधी देणे हे प्रगल्भ आणि सदृढ समाजाचे लक्षण आहे. मात्र असे असतांनाही महिला अत्याचाराच्या प्रमाणात होणारी वाढ ही चिंताजनक असून या संवेदनशील विषयावर विद्यापीठ आणि महाविद्यालयांनी आपल्या परिसरात निकोप वातावरण ठेवण्यावर भर देण्याची गरज आहे असे प्रतिपादन कुलगुरू प्रा.व्ही.एल. माहेश्वरी यांनी केले.

उच्च व तंत्रशिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन आणि कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने दि. २० सप्टेंबर रोजी 'महिला सुरक्षितता व शिष्यवृत्ती' या विषयावर एक दिवसाची विभागस्तरीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. या कार्यशाळेच्या उद्घाटन प्रसंगी प्रा. माहेश्वरी बोलत होते. यावेळी मंचावर प्र-कुलगुरू प्रा. एस.टी. इंगळे, कुलसचिव डॉ. विनोद पाटील, विद्यार्थी विकास संचालक डॉ. जयेंद्र लेकुरवाळे उपस्थित होते.

प्रा. माहेश्वरी म्हणाले की, आज प्रत्येक क्षेत्रात महिला या पुरूषांच्या बरोबरीने प्रसंगी पुढे जाऊन काम करीत आहेत. मात्र दुर्देवाने घरात आणि घराबाहेर महिलांवरील अत्याचार वाढीला लागले आहेत. आपल्या महाविद्यालयाचा व विद्यापीठाचा परिसर हा विद्यार्थिनींसाठी अधिक सुरक्षित राहावा यासाठी प्राचार्यांनी कटाक्षाने लक्ष घालावे. विद्यापीठामार्फत महिला सशक्तीकरणासाठी विविध उपक्रम राबविले जात असल्याचे त्यांनी सांगितले. प्रारंभी प्रा.एस.टी. इंगळे यांनी प्रास्ताविक केले. डॉ. विनोद पाटील यांनी आभार मानले.

उद्घटनानंतर महिला सुरेक्षेसंबंधी कायदे यावर ॲड सुशिल अत्रे तसेच कार्यालयीन ठिकाणी महिलांवर होणारा लैंगिक अत्याचार यावर डॉ.विजेता सिंग यांनी मार्गदर्शन केले. राजर्षी शाहू शिष्यवृत्ती विषयी सहसंचालक कार्यालयातील कनिष्ठ प्रशासन अधिकारी गणेश वळवी यांनी माहिती दिली. या सत्रांचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. गौरी राणे, प्राचार्य डॉ.एस.एस. राजपूत होते. ॲड अत्रे यांनी महिला सुरक्षा कायदा प्रभावी होणेसाठी तरतूद , अंमलबजावणी, देखरेख आणि जनजागृती हे घटक महत्वाचे असल्याचे सांगितले. डॉ. विजेतासिंग यांनी मूलभूत अधिकार व भारतीय राज्यघटना तसेच विशाखा मार्गदर्शक तत्वे, विद्यापीठ अनुदान आयोगाशी मार्गदर्शक तत्वे याविषयी उदाहरणे देत माहिती दिली. डॉ.अजय सुरवाडे यांनी स्पर्धा परीक्षेबाबत विद्यापीठाने सुरु केलेल्या ऑनलाईन फाउंडेशन विषयी माहिती दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन जनसंपर्क अधिकारी डॉ. सुनील पाटील यांनी केले. डॉ. जयेंद्र लेकुरवाळे यांनी आभार मानले.

**बातमी क्र. २**

जळगाव २०, (प्रतिनिधी) : महाराष्ट्र शासनाच्या कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाच्या आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्राचे दूरदृश्य प्रणालीद्वारे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याहस्ते उद्घाटन झाले. कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या विशारद कौशल्य विकास केंद्रा अंतर्गत देखील हे केंद्र विद्यापीठाला मंजूर झाले असून आज उद्घाटन झालेल्या ५४ केंद्रांमध्ये विद्यापीठाच्या या केंद्राचा समावेश होता.

वर्धा येथून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ऑनलाईन पध्दतीने या सर्व केंद्राचे उद्घाटन केले यावेळी राज्यपाल तथा कुलपती सी.पी. राधाकृष्णन, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व अजित पवार, कौशल्य व रोजगार मंत्री मंगलप्रभात लोढा हे सर्व ऑनलाईन पध्दतीने या कार्यक्रमास उपस्थित होते. विद्यापीठाच्या पर्यावरण शास्त्र प्रशाळेच्या सभागृहात या कार्यक्रमाच्या उद्घाटनाचे प्रक्षेपण करण्यात आले. यावेळी कुलगुरू प्रा.व्ही.एल. माहेश्वरी, कुलसचिव डॉ. विनोद पाटील, जिल्हा स्किल कौन्सीलचे विजय पंत व श्री. लांबोळे तसेच केंद्राच्या संयोजक व व्यवस्थापन शास्त्र प्रशाळा संचालक डॉ. मधुलिका सोनवणे, डॉ. अजय गोस्वामी आदी उपस्थित होते. 'आचार्य चाणक्य कौशल्य केंद्रात' १५ ते ४५ वयोगटातील विद्यार्थ्यांना कौशल्य विकासाचे कोर्सेस उपलब्ध करून दिले जाणार आहेत. येत्या १ ऑक्टोबर पासून त्यासाठी नोंदणी सुरु केली जाणार आहे. भौतिकशास्त्र प्रशाळा, व्यवस्थापनशास्त्र प्रशाळा व संगणकशास्त्र प्रशाळा येथे मेक्याट्रोनिक्स, डिजीटल मार्केटींग, अकाऊंट असिस्टंट, वेबपेज डिझायनिंग व सॉप्टवेअर डेव्हलपर हे पाच कोर्सेस उपलब्ध करून दिले जाणार आहे. यावेळी प्रा. मधुलिका सोनवणे यांनी कौशल्य केंद्राविषयी माहिती दिली. कुलगुरू प्रा. माहेश्वरी यांनी जागतिक स्पर्धेत विद्यार्थी टिकून राहण्यासाठी शिक्षणासोबत कौशल्य विकास महत्वाचा आहे असे सांगून या केंद्रांचा विद्यार्थ्यांनी फायदा घ्यावा असे आवाहन केले. डॉ. आर.आर. चव्हाण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.

**बातमी क्र. ३**

जळगाव २०, (प्रतिनिधी) : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या सामाजिक शास्त्रे प्रशाळे अंतर्गत डॉ. आंबेडकर विचारधारा विभागाच्या वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे सुपुत्र यशवंतराव ऊर्फ भैय्यासाहेब आंबेडकर यांच्या स्मृतीदिनानिमित्त अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी संगणकशास्त्र प्रशाळेचे संचालक तथा आंबेडकर विचारधारा विभाग प्रमुख प्रा. राकेश रामटेके म्हणाले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे सामाजिक, सांस्कृतिक आणि शैक्षणिक विचार व चळवळ पुढे नेण्याचे काम भैय्यासाहेबांनी केले. बुध्द धम्म प्रसारातही त्यांचे मोठे योगदान आहे असे ते म्हणाले. यावेळी डॉ. उमेश गोगडीया, डॉ. अभय मनसरे, रोशन मावळे, जितेंद्र पेंढारकर आदी उपस्थित होते. डॉ. विजय घोरपडे यांनी प्रास्ताविक व सूत्रसंचलन केले. सचिन धुंदले याने आभार मानले.

**बातमी क्र. ४**

जळगाव २०, (प्रतिनिधी) : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील सामाजिक शास्त्रे प्रशाळा, समाजकार्य विभाग, राष्ट्रीय सेवायोजन एकक यांच्या संयुक्त विद्यमाने १७ सप्टेंबर रोजी स्वच्छता ही सेवा या अभियानाचे उद्घाटन प्र-कुलगुरू प्रा. एस.टी. इंगळे व कुलसचिव डॉ. विनोद पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले.

यावेळी रा.से.यो. संचालक डॉ. सचिन नांद्रे, रा.से.यो. एकक कार्यक्रम अधिकारी डॉ. मनोज इंगोले, डॉ. कविता पाटील, विलास पाटील, दर्शन नेवे, शिवाजी पाटील, कैलास औटी, शरद पाटील उपस्थित होते. पाहुण्यांच्या हस्ते वृक्षारोपण झाल्यानंतर परिसरातील प्लॅस्टीक संकलन करण्यात आले.

.......................................................................................................................................

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२४ दिनांक: २० सप्टेंबर, २०२४

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी